aglasem.com

FOR KARNATAKA CLASS 10 PREPARATION

Karnataka SSLC Model Question Paper 2027 for Marathi First Language (Paper 3)

EXAM	YEAR	TYPE	SUBJECT
Karnataka Class 10	2027	Sample Paper	Marathi

08-M

ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ
ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು - 560 003

KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD
Malleshwaram, Bengaluru - 560 003

2026 - 27 ರ ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆ – 3

S.S.L.C. MODEL QUESTION PAPER - 3 : 2026 - 27

ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

Subject : First Language — MARATHI

ವಿಷಯ ಸಂಕೇತ : **08-M** | **Subject Code : 08-M**

ಸಮಯ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷಗಳು] | [Time : 3 Hours 15 Minutes

ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : **100**] | [Max. Marks : **100**

विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :

1. प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
3. उजव्या बाजूच्या कडेला (काठावर) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
4. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्नपत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

(Turn over)

08-M

I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा.

6x1=6

1. खालीलपैकी स्वर संधीचे उदाहरण हे आहे -

(अ) तेज:कण (ब) जगन्नाथ

(क) परिणयातूर (ड) दुर्बळ

2. 'मी निबंध लिहिन' या वाक्यातील काळ हा आहे -

(अ) भुतकाळ (ब) भविष्यकाळ

(क) वर्तमानकाळ (ड) अपूर्ण भुतकाळ

3. खालीलपैकी अव्ययीभाव समासाचे उदाहरण हे आहे -

(अ) निळकंठ (ब) सर्वज्ञ

(क) साखरभात (ड) क्षणाक्षणाला

4. 'ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी' या म्हणीचा अर्थ असा आहे -

(अ) उपकारकर्त्याच्या बाजूने बोलू नये (ब) उपकारकर्त्याच्या बाजूने बोलावे

(क) कष्टाशिवाय मोठेपण मिळत नाही (ड) अपेक्षेपेक्षा जास्त मिळणे

5. 'कविता लिहिणारा' या शब्दसमुहासाठी एक योग्य शब्द हा आहे-

(अ) गायक (ब) कपी

(क) वादक (ड) कवी

6. 'आई आणि बाबा उद्या गावी जाणार आहेत' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ही आहे -

(अ) उभयान्वयी अव्यय (ब) शब्दयोगी अव्यय

(क) केवलप्रयोगी अव्यय (ड) क्रियापद

08-M

II) पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा. 4 x 1 = 4

7. स, ला, ते : द्वितीया विभक्ती : : त, ई, आ : .....

8. मुलगा निबंध लिहितो : कर्तरी प्रयोग : : मधुला कुत्रा चावला : .....

9. चंद्र : सुधांशू : : पृथ्वी : .....

10. थोरला : धाकटा : : डोळस : .....

III. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. 7 x 1 = 7

11. निरंजनबुवाच्या मठात काकूंना काय म्हणत होते ?

12. काकूंचा आकांत पाहून शेजाऱ्यांना काय वाटले ?

13. 'गृहिणी मंडळ' या संस्थेच्या जपानमध्ये एकूण किती शाखा आहेत ?

14. पाहुणे म्हणून घरी कोण यावे असे कवीला वाटते ?

15. कवी कावळ्याचे पाय कशाने मढविणार आहेत ?

16. 'गाऊ त्यांना आरती' या कवितेचे मुल्य काय ?

17. दु:खाची ज्योत कशी तेजाळते ?

IV. खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा. 3 x 2 = 6

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

    अ) पांग फेडणे

    ब) इशारा देणे

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा :

    "हटा तटाने पटा रंगवुनि जटा धरिशि का शिरी"

20. गण पाडून वृत्त ओळखा.

    "सहज हवन होते नाम घेता फुकाचे"

08-M

V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा. **7 x 2 = 14**

21. 'अनंतशक्ति परमेश्वरु' या कथेचे तापर्य कोणते ?

22. 'आत्मविश्वासासारखी दुसरी दैवी शक्ती नाही' असे आंबेडकर का म्हणतात ?

23. अनंत काणेकर यांचा परिचय लिहा.

24. "करायच्या तर तीन वाटण्या करा" संदर्भासह स्पष्टीकरण करा.

25. गुराख्याच्या जीवाची आग का होते ?

26. कवी केशवकुमार यांचा परिचय लिहा.

27. 'आम्ही भुके जीव ! देतसू इशारा' संदर्भासह स्पष्टीकरण करा.?

VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा. **1 x 3 = 3**

28. अ) विद्वान सर्वत्र पुज्यते

किंवा

ब) पुष्पासंगे मातीस वास लागे

VII. खालील प्रश्नांची पाच-सहा वाक्यात उत्तरे लिहा. **10 x 3 = 30**

29. वसईच्या किल्ल्यातील रहस्य (भेद) जाणून घेण्यासाठी कोणीकोणी कसे प्रयत्न केले ?

30. जपानमधील 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

31. शिक्षणामुळे आदिवासी मुलांच्या वर्तनात कोणता बदल झाला होता ?

32. ज्योतिबांनी सावित्रीबाईंना कशा तऱ्हेने शिकविले ? सविस्तर लिहा.

33. 'अण्णा वारल्यावर आईचे जगच खलास झाले होते' याचा अर्थ स्पष्ट करा.

34. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?

35. 'भगवंत भुकेला भक्तीचा पाहुना' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

36. मार्कंडेयाची तुलना कवीने देशभक्तांशी का केली आहे ?

37. 'धुळीचेच आहे मला भूषण' असे पृथ्वी का म्हणत आहे ?

38. 'धरण' कवितेत स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन कसे केले आहे.

08-M

VIII. खालील प्रश्नांची आठ-दहा वाक्यात उत्तरे लिहा. **4 x 4 = 16**

39. 'हिरवे सांगाती' या शीर्षकाची यथार्थता स्पष्ट करा.

किंवा

'हिरवे सांगाती' या पाठात आलेल्या सर्व वृक्षांची वैशिष्ट्ये लिहा.

40. गंगूबाईंनी संगीत शिक्षणासाठी कशाप्रकारे कष्ट घेतले? व त्यांची गुरुनिष्ठा कोणत्या प्रसंगातून दिसुन येते ?

किंवा

शारदांबेचा आशीर्वाद खऱ्या अर्थाने आपल्याला मिळाला, असे गंगूबाईला का वाटले ? ते सविस्तर लिहा.

41. 'या भारतात बंधुभाव' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा.

उरि जेव्हा .....

.....

..... पोटी.

किंवा

म्हटले .....

.....

..... दक्षिण उत्तर.

08-M

IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा. 1 x 4 = 4

(2+2)

43. आजच्या भारताला अशा तरुणांची गरज आहे, ज्यांचे स्नायू लोखंडासारखे मजबूत आणि मज्जातंतू पोलादासारखे कणखर असतील. केवळ ग्रंथ वाचून किंवा पदव्या मिळवून देशाचा उध्दार होणार नाही, तर त्यासाठी मन आणि मनगट दोन्ही सशक्त हवेत. तरूणांनी स्वत:मधील सुप्त शक्तिवर विश्वास ठेवला पाहिजे. 'मी हे करु शकत नाही' हा विचारच मुळात पाप आहे. जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही. कारण सर्व शक्ति तुमच्या अंत:करणात वास करत आहे. जोपर्यंत तुम्ही स्वत:वर विश्वास ठेवत नाही, तोपर्यंत देवावर विश्वास ठेवणे व्यर्थ आहे. संकटे ही माणसाला घाबरवण्यासाठी येत नसतात, तर त्याच्यातील धैर्याची परीक्षा घेण्यासाठी येत असतात. उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका, हा संदेश केवळ घोषणेपुरता मर्यादित न ठेवता तरुणांनी तो आपल्या आचरणात आणला पाहिजे. जेव्हा देशातील तरुण स्वाभिमानी, नीतिमान आणि कष्टाळू बनेल, तेव्हाच आपला देश जगाच्या पाठीवर महासत्ता म्हणून अभिमानाने उभा राहील.

प्रश्न :

अ) लेखकाच्या मते आजच्या भारताला कशाप्रकारच्या तरुणांची गरज आहे ?

ब) तरुणांनी स्वत:वर विश्वास ठेवणे का गरजेचे आहे ?

X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा. 1 x 5 = 5

44. शाळेच्या शैक्षणिक सहलीला जाण्यासाठी परवानगी (संमती) मागणारे पत्र तुमच्या वडिलांना लिहा.

किंवा

तुमच्या मोठ्या बहिणीचे लग्न असल्यामुळे तुम्हाला चार दिवसाची रजा हवी आहे. त्यासाठी तुमच्या वर्गशिक्षकांना रजेचा अर्ज लिहा.

XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधनलेखन करा. 1 x 5 = 5

45. अ) पर्यावरण संवर्धन – काळाजी गरज.

ब) मी शिक्षक झालो तर….. !

❑❑